श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

दिनांक : १२/१२ /२०२४

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय : नूतन वर्ष दि. १ जानेवारी, २०२५ या उत्सवासाठी तात्पुरत्या स्वरूपाची २० नग वॉकी–टॉकी खरेदी करण्याकरीता दरपत्रके मागविण्याबाबत.

नूतन वर्ष दि. १ जानेवारी, २०२५ या उत्सवाकरीता तात्पुरत्या स्वरूपाची २० नग वॉकी–टॉकी खरेदी करण्याकरीता भाडेतत्वावर सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या**www.siddhivinayak.org**या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

अटी व शर्ती –

१. सिलबंद लखोटयावर ठळक अक्षरात दरपत्रकाचा विषय स्पष्टपणे नमूद करावा. तांत्रिक दरपत्रक तपशील व मूल्य दरपत्रक तपशील इच्छूक व्यक्ती/एजन्सी/कंपनी यांनी आपली वैयक्तीक माहिती, मोबाईल क्रमांक याप्रमाणे दोन वेगवेगळया लखोटयामध्ये भरुन लाखेने सिलबंद करुन दि. १८/१२/२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत न्यासाच्या प्रतिक्षालय इमारतीमधील तळ मजला आवक जावक नोंदणी शाखेत सादर करावी.

२. दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे कर मिळून एकत्रित एकूण रक्कम भरावी. दरपत्रक भरताना न्यासाने दिलेल्या दरपत्रकात भरून देणे आवश्यक व गरेजेचे आहे. न्यास दरपत्रकात दर भरून न दिल्यास सदर कंपनीस अपात्र ठरविण्यात येईल.

३. आपल्या क्षेत्रात करीत असलेल्या कामाचा ३ वर्षाचा अनुभव असल्याबाबतची प्रमाणपत्रे सादर करावी.

४. मागील ३ वर्षाची आर्थिक उलाढाल कमीत कमी १० लक्ष असावी. याबाबत सनदी लेखापाल (सीए) यांचे प्रमाणपत्र आवश्यक. इनकम टॅक्स रिर्टन (आयटीआर) सादर केल्यास ते ग्राहय धरण्यात येणार नाही.

५. दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून २०–२५ किमी अंतरावर असणे आवश्यक आहे. जेणेकरुन न्यासास त्वरीत सेवा उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

६. आपण केलेल्या कामाचा सविस्तर तपशिल व छायाचित्र देयकासोबत जोडण्यात यावी. अन्यथा देयके अदा केले जाणार नाही.

७. सर्व ठिकाणी बसविण्यात येणाऱ्या यंत्रणेमध्ये कोणताही तांत्रिक बिघाड होणार नाही याची दक्षता घ्यावी. आवश्यकतेनुसार आपले प्रतिनिधी २४ तास हजर ठेवणे बंधनकारक राहील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही.

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

८. आपणास दिलेल्या वेळेनुसार काम पूर्ण न केल्यास संबंधितांवर नियमांप्रमाणे कडक कार्यवाही करण्यात येईल.

९. काम सुरू करण्यापूर्वी कोणतेही आगाऊ प्रदान केले जाणार नाही. न्यासाच्या परवानीशिवाय कोणतेही अतिरिक्त काम करण्यात आल्यास केलेल्या कामाचा जादा मोबदला आपणास देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. काम पूर्ण केल्यानंतर न्यासास बिल सादर करताना बिलासोबत पॅनकार्ड/जीएसटी क्रमांकाचा तपशील व कंपनीच्या बॅंकेचा तपशील (बॅंकेचे नांव, खाते क्र., आयएफएसी कोड ) जोडावा.

१०.कर्मचारी भरपाई अधिनियम १९२३ या कायद्याअंतर्गत आपणावर सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

११.माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११/१११२ वर न्यासाचे पर्यवेक्षक श्री. मंगेश कुंटे देखभाल व दुरूस्ती विभाग यांच्याशी संपर्क साधावा.

१२.नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी दरपत्रकधारक यांची राहील.

१३.दरपत्रकधारकाने **GST** क्रमांक व **PAN** कार्ड दरपत्रकांत नमूद करावा व दरपत्रकासोबत जोडावा.

१४.दरपत्रकधारकाने **GST** क्रमांक लागू नसल्यास, कंपनी लेटरहेडवर तसे नमूद करून न्यास दरपत्रकासोबत सादर करावे.

१५.दि.१९/१२/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडताना दरपत्रकधारकाने सदर दिवशी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. दरपत्रकधारक दरपत्रके उघडताना उपस्थित न राहिल्यास दरपत्रक उघडल्यानंतर आपले कोणतेही म्हणणे मान्य केले जाणार नाही. दरपत्रके उघडल्यानंतर दरपत्रकामध्ये कोणतेही बदल करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

# दरपत्रकाचा तपशील

विषय : २० नग वॉकी–टॉकी खरेदी करण्याकरीता सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबत.

नाव:.....................................................................................................................

पत्ता व मोबाईल क्र : ..............................................................................................

.................................................................................................................................

.................................................................................................................................

जीएसटी क्रमांक : ........................................ पॅन कार्ड क्रमांक : .....................

| अ.क्र. | तपशील | प्रति रक्कम रू. | २० नग वॉकी–टॉकी दर (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|
| १ | वॉकी–टॉकी | | |
| | | **GST** | |
| | | एकूण रक्कम (सर्व करांसहित) | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का